## विशेष दरखास्त क्र. २/२०२० मध्ये निशाणी क्र. ४७ कडील अर्जावर आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांच्यातर्फे दावा कलम १अ व १ब या मिळकतीच्या आयडेंटीफिकेशनसाठी न्यायालयामार्फत चौकशी करण्यासाठी न्यायालयामार्फत कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करण्याबाबत व नियमित दिवाणी दावा क्र. १२९/२०१२ मधील प्राथमिक हुकूमनामा दुरुस्त करण्याबाबत दाखल केला आहे.

२) न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार नियमित दिवाणी दावा क्र. १२९/२०१२ या दाव्यातील हुकूमनाम्याप्रमाणे न्यायालयाने दाव्यातील कलम १ मध्ये वर्णन केलेल्या ब ते इ या मिळकतीतील २/३ हिस्स्यात वादी यांना ७/७२ हिस्सा जाहीर केला आहे. वादी व प्रतिवादी यांचे पुर्व हक्कदार मयत अब्दुल गनी काझी यांनी दावा मिळकतीबाबत दिनांक ११/०१/२००७ रोजी न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांच्या लाभात नोंदणीकृत मृत्युपत्र लिहून दिले होते व आहे. तसेच दावा कलम १अ मध्ये वर्णन केलेली मिळकत न्यायनिर्णित ऋणको क्र. ७ व ८ यांना ०२/०२/२००८ रोजी कायम खुशखरेदी देऊन कब्जात दिली होती. न्यायालयाने नियमित दिवाणी दावा क्र. १२९/२०१२ या दाव्याच्या न्यायनिर्णयामध्ये सदरचे मृत्युपत्र व खरेदीखत कायदेशीर असल्याचा न्यायनिर्णय केला आहे. सदर हुकूमनामा करतेवेळी न्यायालयाने दावा कलम १अ व १ब या मिळकती स्वतंत्र मिळकती आहेत असे अनावधानाने व नजरचुकीने समजून कलम १ब मधील नमूद मिळकत ही वेगळी व मृत्युपत्रातील समजून त्यातील २/३ हिस्स्यातील ७/७२ हिस्सा वादीस बहाल केला आहे. न्यायालयाने एकाच मिळकतीबाबत वादीची वाटपाची मागणी फेटाळली आहे व पुन्हा त्याच मिळकतीत वादीस हिस्सा दिला आहे. सदरची चुक अनावधानाने व गैरसमजुतीने झाली आहे. प्रस्तुत अर्जात अशी विनंती

केली आहे की, दावा कलम १अ व १ब या मिळकतीच्या आयडेंटीफिकेशनसाठी न्यायालयामार्फत चौकशी करण्यात यावी व न्यायालयामार्फत कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करण्यात यावी व चौकशीअंती नियमित दिवाणी दावा क्र. १२९/२०१२ मधील प्राथमिक हुकूमनामा दुरुस्त करण्यात यावा.

३) न्यायनिर्णित धनको यांनी न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांच्या प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. ५१ कडे म्हणणे दाखल केले आहे. न्यायनिर्णित धनको यांनी निशाणी क्र. ५१ कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, दावा कलम १अ व १ब ही एकच मिळकत आहे. दरखास्तदार व सामनेवाला यांचे वडील अब्दुल गणी बावाशा काझी यांनी सामनेवाला यांना दिनांक ११/०१/२००७ रोजी दस्त क्र. ११४ ने संपूर्ण मिळकतीचे रजिस्टर मृत्युपत्र लिहून दिले होते. परंतु मुस्लीम कायद्याप्रमाणे मृत्युपत्र करणाऱ्या इसमास त्याच्या मिळकतीच्या १/३ भागापेक्षा जास्त मिळकत मृत्युपत्राद्वारे डिस्पोज करण्याचा अधिकार नाही व त्यामुळे न्यायालयाने न्यायनिर्णित ऋणको क्र. ७ व ८ यांना मृत्युपत्रानुसार दावा मिळकतीत १/३ हिस्सा दिला व उरलेल्या २/३ मिळकतीचे सर्व वारसांमध्ये वाटप करण्याचा आदेश केला. न्यायनिर्णित धनको यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये पुढे असे कथन केले आहे की, नि.दि.दावा क्र. १२९/२०१२ या दाव्याच्या न्यायनिर्णयामध्ये न्यायालयाने परिच्छेद क्र. ५२ मध्ये असे मत नोंदविले आहे की, The bequest of entire suit 1B to 1E property in favour of Defendant 6 to 8 resulting in the curtailment to the extent of 1/3rd. Therefore, remaining 2/3rd property from suit 1B to 1E property is available for partition between all legal heirs of deceased.

४) न्यायनिर्णित धनको यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये पुढे असे कथन केले आहे की, न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांनी निशाणी क्र. ४७ कडील अर्जामध्ये केलेल्या मागण्या ह्या कोर्टाची दिशाभुल करण्यासाठी केलेल्या

आहेत व त्यामुळे कोर्ट कमिशनर यांची नेमणुक करण्याची व झालेला हुकूमनामा दुरुस्त करण्याची आवश्यकता नाही. न्यायनिर्णित धनको यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५) प्रस्तुत अर्जाच्या कामी न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ व न्यायनिर्णित धनको यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६) न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ हे या कामी "1982 DGLS (Bom.) 19, Madhukar Trimbak Gore Vs. Vasant Ramkrishna Kolhatkar" (Equivalent Citation – 1983 AIR (Bom.) 227) या आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर विसंबुन राहीले आहेत. मी उपरोक्त न्यायनिवाड्याचे अवलोकन केले. उपरोक्त न्यायनिवाड्यामध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

"When in execution a question arises as to the indentily of the property of which possession has to be delivered to the decree-holder, obviously such a question would relate to the execution of the decree and it would be for the executing Court to decide it as required by sub section (1) of Section 47 of the Code, since it would not be possible for the decree-holder to get it determined by a separate suit."

७) न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ हे या कामी "2008 DGLS (SC) 1597, S. Satnam Singh and Others Vs. Surender Kaur and another" (Equivalent Citation – 2009 AIR (SC) 1089) या आदरणीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर विसंबुन राहीले आहेत. मी

उपरोक्त न्यायनिवाड्याचे अवलोकन केले. वाटपाच्या दाव्यामध्ये प्राथमिक हुकूमनामा पारीत केल्यानंतर मिळकतींच्या यादीमध्ये जास्तीची मिळकत वाढविता येते किंवा कसे हा प्रश्न उपरोक्त न्यायनिवाड्यामधील नमूद प्रकरणामध्ये विचाराधीन होता. उपरोक्त न्यायनिवाड्यामधील नमूद प्रकरणातील वस्तुस्थीती व हातातील प्रकरणातील वस्तुस्थीती भिन्न आहे.

८) न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ हे या कामी "C.R.P.(NPD) No. 966 of 2014 and M.P. No. 1 of 2014, Alagammal and Others Vs. Minor Manikandan S/o. Govindaraj Rep. By next friend/guardian mother Amutha" या आदरणीय मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर विसंबुन राहीले आहेत. मी उपरोक्त न्यायनिवाड्याचे अवलोकन केले. उपरोक्त न्यायनिवाड्यामध्ये आदरणीय मद्रास उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

"Section 97 of C. P. C. that provides that where any party aggrieved by a preliminary decree passed after the commencement of the Code does not appeal from such decree, he shall be precluded from disputing its correctness in any appeal which may be preferred from the final decree does not create any hindrance or obstruction in the power of the court to modify, amend or alter the preliminary decree or pass another preliminary decree if the changed circumstances so require."

९) उपरोक्त न्यायनिवाड्यांमध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने व आदरणीय मद्रास उच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या मताच्या अनुषंगाने हातातील प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, न्यायनिर्णित धनको यांनी प्रस्तुतची दरखास्त नियमित दिवाणी दावा

क्र.१२९/२०१२ या प्रकरणातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. न्यायनिर्णित धनको यांनी निशाणी क्र. ३९ कडील यादीसोबत नियमित दिवाणी दावा क्र. १२९/२०१२ या प्रकरणातील न्यायनिर्णयाची सत्यप्रत दाखल केली आहे. सदर न्यायनिर्णयाच्या सत्यप्रतीचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी अल्ताफ अब्दुल गणी काझी यांनी सदरचा दावा हा दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळण्याकरीता व जाहीर ठराव करुन मिळण्याकरीता दाखल केला होता. वादीच्या कथनानुसार सदर दाव्यातील नमूद दावा मिळकती ह्या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ व ७ व ८ यांचे वडील अब्दुल गणी काझी यांच्या मालकीच्या व कब्जे वहिवाटीच्या होत्या. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ हे अब्दुल गणी काझी यांना पहिल्या पत्नीपासून झालेली मुले आहेत व प्रतिवादी क्र. ७ व ८ हे अब्दुल गणी काझी यांना दुसऱ्या पत्नीपासून म्हणजेच प्रतिवादी क्र. ६ पासून झालेली मुले आहेत. वादीने सदर दाव्यामध्ये अब्दुल गणी काझी यांनी दिनांक ११/०१/२००७ रोजी दावा मिळकतीसंदर्भात प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांच्या लाभात निष्पादीत केलेले मृत्युपत्र आव्हानित केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये हे न्यायालय या निष्कर्षास आले आहे की, सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांनी मयत अब्दुल गणी काझी यांचे दिनांक ११/०१/२००७ रोजीचे मृत्युपत्र सिद्ध केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये हे न्यायालय या निष्कर्षास आले आहे की, मुस्लीम कायद्यातील तरतुदीनुसार कोणत्याही मुस्लीम व्यक्तीला त्याच्या मिळकतीच्या १/३ भागापेक्षा जास्त मिळकत मृत्युपत्राद्वारे डिस्पोज करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे सदर न्यायनिर्णयाद्वारे या न्यायालयाने मयत अब्दुल गणी काझी यांनी दिनांक ११/०१/२००७ रोजी निष्पादीत केलेले मृत्युपत्र हे त्यांच्या मिळकतीच्या म्हणजेच दावा मिळकतींच्या १/३ भागापुरते वैध असल्याचे ग्राह्य धरले आहे व उर्वरीत दावा मिळकतींमध्ये म्हणजेच दावा मिळकतींच्या २/३ भागामध्ये वादीला ७/७२ इतका हिस्सा असल्याचे

घोषीत केले आहे. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांमुळे माझ्या मते न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांनी या अर्जामध्ये हुकूमनामा करतेवेळी न्यायालयाने दावा कलम १अ व १ब या मिळकती स्वतंत्र मिळकती असल्याचे अनावधानाने व नजरचुकीने समजल्याबाबत व दावा कलम १ब मधील नमूद मिळकतीतील २/३ भागामध्ये वादीला अनावधानाने व गैरसमजुतीने ७/७२ इतका हिस्सा दिल्याबाबत केलेले कथन समर्थनीय नाही. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांमुळे माझ्या मते न्यायनिर्णित ऋणको क्र. ६ ते ८ यांनी दावा कलम १अ व १ब या मिळकतीच्या आयडेंटीफिकेशनसाठी न्यायालयामार्फत कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्याबाबत व नियमित दिवाणी दावा क्र. १२९/२०१२ या दाव्यातील प्राथमिक हुकूमनामा दुरुस्त करण्याबाबत प्रस्तुत अर्जामध्ये केलेली विनंती समर्थनीय नाही. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज कायद्याने समर्थनीय नाही व तो नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.03.10 18:13:47 +0530

दिनांकः– १०/०३/२०२६ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड